**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ०१/२०१८.**

**सरकार विरूध्द सदाशिव निंबा खैरनार.**

निशाणी क्र. १० लगत जोड.

CNR No.:MHNS25-000002-2018

## न्यायनिर्णय

(निकाल घोषीत दिनांक २४ जुलै, २०१९)

आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, ४२९ व मोटार वाहन कायदा कायदा कलम १८४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२. फिर्यादी पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे :-

यातील आरोपीने दि. १०/०२/२०१५ रोजी रात्री ००.३० वाजेच्या सुमारास, उमराणे-चांदवड रस्तयावर, उमराणे शिवार, शेतकी फार्मचे जमिनीसमोर, ता. देवळा, जि. नाशिक येथे त्याचे ताब्यातील आयशर गाडी क्र.एमएच-१८-एए-१३२० ही अविचाराने, हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, भरधाव वेगात चालवून पुढे जाणा-या ट्क क्र. एमएच-१५/जी-५५५६ हीस धडक देउन, स्व:ताच्या गंभीर दुखापतीस, तसेच आयशर वाहनातील दोन म्हशी व एक पारडु यांच्या मरणास व दोन्ही वाहनांच्या नुकसानीस कारणीभूत ठरला, म्हणून त्याचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**३.** आरोपीचे निशाणी क्र. १० प्रमाणे प्रतिकथन नोंदविणेत आले. आरोपीने गुन्हा नाकबूल केल्यामुळे त्याचेविरूध्द पुढे प्रकरण चालविण्यात आले.

**४.** सदर कामी माझे समोर निशाणी १० प्रमाणे खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले, त्यांचे सकारण न्यायनिर्णय मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दि. १०/०२/२०१५ रोजी रात्री ००.३० वाजेच्या सुमारास, उमराणे-चांदवड रस्तयावर, उमराणे शिवार, शेतकी फार्मचे जमिनीसमोर, ता. देवळा, जि. नाशिक येथे त्याचे ताब्यातील आयशर गाडी क्र.एमएच-१८-एए-१३२० ही हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे रस्त्याच्या परिस्थिती- कडे दुर्लक्ष करून जेणेकरून मानवी जीविताला धोका होईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल इतक्या भरधाव वेगाने चालविली, त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये गुन्हा केला ? | : | सिध्द नाही. |
| २. | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन निष्काळजीपणे चालवून स्वत:च्या किरकोळ दुखापतीस कारणीभूत झाला व त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ अन्वये गुन्हा केला ? | | सिध्द नाही. |
| ३. | वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन निष्काळजीपणे चालवून स्वत:च्या गंभीर दुखापतीस कारणीभूत झाला व त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ अन्वये गुन्हा केला ? | | सिध्द नाही. |
| ४ | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने, दोन्ही वाहनांचे नुकसान करून, भारतीय दंड विधान कलम ४२७ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला? | | सिध्द नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वरील वाहन चालवत असतांना, पुढे जाणा-या ट्रक क्र. एमएच-१५/जी-५५५६ हीस धडक देउन, सदर ट्रकमधील दोन म्हशी व एक पारडु यांच्या मरणास कारणीभूत झाला व त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम ४२९ अन्वये गुन्हा केला? | : | सिध्द नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन मानवी जीवितास धोकादायक ठरेल अशा पध्दतीने चालविले व त्यायोगे मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केला ? | : | सिध्द नाही. |
| ७. | अंतिम आदेश काय ? | : | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## कारणमीमांसा

**५.** आरोपीवर प्रस्थापित केलेला गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण पाच साक्षीदार तपासले. फिर्यादी साक्षीदार क्र. १ निवृत्ती गंगाधर पवार, साक्षीदार क्र.२ कृष्णा शिवाजी जाधव, क्र. ३ दिपक अशोक पवार, पंच साक्षीदार क्र.४ मुश्ताक उस्मान पठाण व साक्षीदार क्र.५ तपासाधिकारी तानाजी बाबुलाल ठाकरे, हे साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी पक्षातर्फे फिर्याद नि.१२, घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १३, वैद्यकीय अधिका-यांना नि.क्र. १६ चे पाठविलेले पत्र, परिवहन अधिकारी, मालेगांव यांना पाठविलेले नि.क्र. १७ चे पत्र, पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन प्राप्त अहवाल नि.क्र. १८ ते २०, जख्मी वाहन चालकाचे वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र. २१ व २२, असा कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आला.

**६.** आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदवलेले असून, त्यामध्ये त्याने खोटी फिर्याद दाखल केली, असा बचाव घेतला.

**७.** दोन्ही पक्षांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. सरकारपक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्री. एस.जी.पाटील यांनी असा युक्तिवाद केला की, सदरकामातील घटनास्थळ पंचनामा शाबीत

केलेला आहे. साक्षीदार क्र. १ या प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने सदर अपघात झाल्याचे व आरोपी विरूध्द त्याने स्वत:हा फिर्याद दिल्याचे नमुद केले आहे. तसेच, तपासाधिकारी यांनीही त्यांच्या तपासादरम्यान आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे पुराव्यात नमुद केले आहे. साक्षीदारांनी आरोपी हा अपघातग्रस्त वाहन चालवित असल्याचे न्यायालयात शपथेवर सांगितले आहे. सदर प्रकरणात मयत गुरांचे शवविच्छेदन करण्यात येउन पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन त्याबाबतचा अहवाल प्राप्त करण्यात आला आहे, तसेच जख्मी वाहन चालकाचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि परिवहन अधिकारी, मालेगांव यांचा तांत्रिक वाहन तपासणीचा अहवाल दाखल करण्यात आला आहे. वाहनाचा तपासणी अहवालानुसार गाडीत कोणताही तांत्रिक दोष नव्हता. अपघात आरोपीच्या चुकीमुळे घडल्याची बाब फिर्यादी पक्षाने संशयातितरित्या शाबीत केलेली आहे. सबब, आरोपीस दोषी धरून जास्तीत जास्त शिक्षा करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

८. आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. यु.एच.आहेर यांनी असा युक्तीवाद केला की, सदर कामातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र. १ ते ३ यांनी जरी सदर अपघात घडल्याचे कथन केले असले, तरी त्यांच्या पुराव्याला दुजोरा देण्याकरीता दुसरा कोणताही स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. दुसरी महत्वाची बाब म्हणजे सा.क्र. १ ते ३ यांच्या पुराव्यामध्ये प्रत्येक साक्षीदार हा सदर घटना दुपारी १२.०० ते १२.३० वाजता घडल्याचे सांगतो, परंतु अभियोगपक्षाच्या कथनानुसार प्रत्यक्षात घटना ही रात्री ००.३० वा. घडली आहे. सबब, सदर घटनेच्या वेळेबाबत साक्षीदारांच्या पुराव्यात विसंगती आढळते. याशिवाय, सदर पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराला दुजोरा देण्याकरीता दुसरा पंच तपासण्यात आलेला नाही. तपासाधिकारी यांनी सदर प्रकरणात प्रथम खबर न देउन व प्राथमिक चौकशी न करता, थेट गुन्हा दाखल केला. तसचे, फिर्यादी त्याच्या पुराव्यात त्याने देवळा पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्याचे सांगतो, तर त्याचवेळी उमराणे पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्याचे

सांगतो. यावरून त्याने निश्चितपणे कोठे फिर्याद दिली याबाबत त्याच्या पुराव्यात विसंगती आहे, असा युक्तीवाद करून, आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत यावी, अशी विनंती केली.

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ६ साठी</u> :-**

**९.** उपरोक्त नमूद मुद्दे हे एकाच घटनेशी संबंधीत असल्याने त्यांचा उहापोह एकत्रितरित्या करण्यात आला.

**१०.** सदरकामी साक्षीदार क्र.१ निवृत्ती पवार हा फिर्यादी असुन त्याने सदर घटनेबाबत त्याच्या पुराव्यात कथन केले आहे. सदर घटना ही दुपारी १२.१५ ते १२.३० वाजता घडली असे तो कथन करतो. सदर वेळी तो त्याच्या ताब्यातील वरील ट्रक घेउन जात असतांना आरोपीने त्याच्या ताब्यातील आयशर क्र. एमएच-१८/एए-१३२० हे वेगात चालवुन त्याच्या वाहनाला धडक दिली. सदर अपघातामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले व आयशरमधील चार पारडे मयत झाले असेही तो पुराव्यात कथन करतो. त्याप्रमाणे त्याने नि.क्र. १२ ची फिर्याद नोंदविली.

**११.** साक्षीदार क्र. २ कृष्णा जाधव व साक्षीदार क्र. ३ दिपक अशोक पवार हे सुध्दा सदर घटनेबाबत साक्षीदार क्र. १ प्रमाणेच कथन करतात. साक्षीदार क्र. ४ मुश्ताक उस्मान पठाण हा पंचनाम्याचा साक्षीदार असुन तो त्याच्या पुराव्यात, पोलिसांनी सदर पंचनामा तो व दुसरा पंच यांच्यासमोर तयार केला, त्यानंतर त्यांनी सदर पंचनाम्यावर सहया केल्या, पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, तसेच सदर अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले होते, असे कथन करतो. तसेच पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर त्याची सही असल्याचे तो नमुद करतो.

**१२.** सदर कामातील साक्षीदार क्र. ५ तपासी अधिकारी, सेवानिवृत्त एएसआय ठाकरे यांनी सदर गुन्हयात त्यांनी पंचनामा केला, मयत म्हशींचे पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन शवविच्छेदन करवुन घेउन त्याबाबतचा अहवाल संचिकेवर दाखल केला, सदर वाहनाची परिवहन

अधिकारी, मालेगांव यांच्याकडुन तांत्रीक तपासणी करवुन घेउन त्याचा अहवाल संचिकेवर दाखल केला, जख्मी वाहन चालकाचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करून प्रकरणात दाखल केले, असे त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे.

**१३.** वरील सर्व साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र. १ निवृत्ती पवार, साक्षीदार क्र. २ कृष्णा जाधव यांनी सदर घटना ही दुपारी १२.०० ते १२.३० वाजता घडली असे कथन केले आहे, तर साक्षीदार क्र. ३ दिपक पवार यांने सदर घटना ही रात्री १२.३० वाजता घडली असे कथन केले आहे. सदर साक्षीदारांच्या घटनेच्या वेळेबाबत अवलोकन केले असता, त्यांच्या पुराव्यात याबाबत भिन्नता असल्याचे दिसुन येते. त्यामुळे घटना नेमकी कीती वाजता घडली याबाबत संशय निर्माण होतो.

**१४.** साक्षीदार क्र. १ हा त्याच्या पुराव्यात त्याने देवळा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असे सांगतो, तर त्याच्या उलटतपासात त्याने उमराणे येथे फिर्याद दिल्याचे खोटे सांगितले, हे म्हणणे खरे नाही, असे कथन करतो. यावरून साक्षीदार क्र. १ ने सदर फिर्याद देवळा पोलिस ठाणे येथे दाखल केली किंवा उमराणे येथे दाखल केली, याबाबत निश्चित कथन आलेले नाही.

**१५.** साक्षीदार क्र. १ व २ यांनी सदर घटनेत त्यांच्या ट्कपुढे एक लक्झरी बस जात होती व आरोपीचे वाहन त्यांच्या ट्कवर मागुन धडकली व त्यांचे वाहन सदर लक्झरीबसवर आदळले असे कथन केले आहे. परंतु, दोन्हीही साक्षीदारांना सदर लक्झरीबसचा क्रमांक सांगता आलेला नाही.

**१६.** साक्षीदार क्र. १ ने त्याच्या सरतपासात आयशर वाहनात असलेले चार पारडे मयत झाल्याचे कथन केले आहे, परंतु बचावपक्षाच्या वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात सदर बाब त्याच्या फिर्यादमध्ये का नमुद नाही, याचे कारण त्याला सांगता येणार नाही असे कथन करतो.

साक्षीदार क्र. १ ते ३ यांनी सदर घटनास्थळी दुभाजक होते, गतिरोधक होते असे कथन केले आहे. त्यामुळे त्यांच्या वाहनाचा वेग कमी होता असे कथन केले आहे. साक्षीदार क्र. १ ने त्याच्या उलटतपासात पोलिसांनी त्याच्या फिर्यादमध्ये काय लिहुन घेतले आहे हे त्याला सांगता येणार नाही, ही एक अत्यंत महत्वाची कबुली दिली आहे. यावरून सदर फिर्यादमधील मजकुराबाबतच्या सत्यतेबाबत संशय निर्माण होतो.

**१७.** सदर प्रकरणातील साक्षीदार क्र. ४ मुश्ताक पठाण हा पंचनाम्याचा साक्षीदार आहे. त्याने जरी सदर पंचनाम्याबाबत अभियोगपक्षास मदत केली असली, तरी त्याच्या उलटतपासात अपघात झालेला दिसला म्हणुन त्याने सदर पंचनाम्यावर सही केली असे कथन केले आहे. तसेच, ट्कमधील कृष्णा जाधव म्हणजेच सदर प्रकरणातील सा. क्र. २ हा त्याच्या ओळखीचा होता म्हणुन त्याने पंचनाम्यावर सही केली असेही कथन केले आहे. यावरून सदर पंच साक्षीदाराच्या पुराव्याच्या विश्वासार्हताबाबत संशय निर्माण होतो. दुसरी महत्वाची बाब म्हणजे जरी सदर साक्षीदाराने पंचनाम्याबाबत अभियोगपक्षास सहायय केले असले, तरी त्याच्या पुराव्याला पाठींबा देण्याकरीता दुसरा पंच साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात आलेला नाही.

**१८.** साक्षीदार क्र. ५ तानाजी ठाकरे हे सदर प्रकरणातील तपासाधिकारी असुन त्यांनी सदर गुन्हयाचा तपास केला आहे. सदर प्रकरणात त्यांनी फिर्याद दाखल झाल्यानंतर, गुन्हा रजि.क्र. २३/२०१५ नोंदविला. वास्तविक पाहता, सदर प्रकरणात फिर्याद निवृत्ती गंगाधर पवार याने फिर्याद दिल्यानंतर, तपासाधिकारी यांनी प्रथम खबर नोंदविणे व प्राथमिक चौकशी करणे कायदयान्वये अपेक्षीत होते. परंतु, तसे न करता तपासाधिकारी यांनी सदर प्रकरणात थेट गुन्हा नोंदवुन घेतला. सबब, ही बाब अभियोगपक्षाच्या विरोधात जाते. दुसरी महत्वाची बाब म्हणजे, सदर प्रकरणातील साक्षीदार क्र. १ व २ यांनी त्यांच्या पुराव्यात सदर घटनेत त्यांच्या ट्कच्या पुढे एक लक्झरी बस जात होती व आरोपीच्या वाहनाने

त्यांच्या वाहनाला पाठीमागुन दिलेल्या धडकेमुळे त्यांचे वाहन सदर लक्झरी बसवर आदळले, असे कथन केले आहे. परंतु, साक्षीदार क्र. ५ तपासाधिकारी यांनी त्यांच्या उलटतपासात त्यांनी सदर लक्झरीबसचा तपास केला नाही अशी कबुली दिली आहे. तसेच, घटनास्थळी सदर लक्झरीबस नव्हती असेही ते कबुल करतात. यावरून, अभियोगपक्षाच्या कथनानुसार व साक्षीदारांच्या कथनानुसार सदर अपघातात लक्झरीबसचा समावेश होता किंवा नाही याबाबत दाट संशय निर्माण होतो.

**१९.** अभियोगपक्षाचे प्रकरणातील कथन, वरील उपरोक्त सर्व साक्षीदारांचे पुराव्यातील कथन, तपासाधिकारी यांचे पुराव्यातील कथन, तसेच साक्षीदारांच्या पुराव्यात एकाच घटनेबाबत आलेल्या वेगवेगळया विधांनाचा विचार करता, सदर दिवशी आरोपीच सदर आयशर वाहनावर चालक म्हणुन कार्यरत होता व त्याच्या चुकीमुळेच सदर अपघात होउन आयशरमधील दोन म्हशी व एक पारडे मयत झाले, तसेच सदर वाहनांचे नुकसान झाले, या बाबी संशयापलिकडे सिध्द झालेल्या नाहीत. दुसरी महत्वाची बाब म्हणजे सदर दिवशी आरोपी हा अपघातग्रस्त आयशर वाहन चालवित होता, ही बाब सिध्द करण्याकरीता कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात सदर आयशर वाहन होते व त्याच्या चुकीमुळेच अपघात झाला, ही बाब निर्विवादपणे सिध्द होत नाही. सबब, आरोपीला संशयाचा फायदा मिळणे न्यायोचित आहे. सबब, मी या सर्व मुद्यांचे उत्तर '**सिध्द नाही**' असे देते.

<u>**मुद्‌दा कमांक ७ साठी**</u> **:-**

**२०.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ ची पूर्तता केलेली आहे. मुद्‌दे क्र.१ ते ६ चे नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता मुद्‌दा क्र.७ च्या उत्तरार्थ खालीप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## –:: **आदेश** ::–

१. आरोपी सदाशिव निंबा खैरनार याची भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, ४२९ व मोटार वाहन कायदा कायदा कलम १८४ मधील गुन्हयातून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

(स्वरा स. पारखी)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
देवळा, ता. देवळा, जि.नाशिक.

दिनांक :- २४/०७/२०१९.
ठिकाण :- देवळा.